| | | |
|---|---|---|
| | **नाशिक महानगरपालिका, नाशिक**<br>**सार्वजनिक आरोग्य विभाग** | |

**दुरध्वनी क्रमांक** :- 0253- 2317292, 2222532
**ई-मेल आयडी** :- nmcmsmd@nmc.gov.in /pub_health@nmc.gov.in

**कार्यालय :** सार्वजनिक आरोग्य विभाग, 3 रा मजला, राजीव गांधी भवन, शरणपूररोड, नाशिक 422 002 Website : https://nashikcorporation.in

जा.क्र./सा.आ.वि./वशि/डेस्क-17/ 9036/2021, ता. २२/४/२१ दिनांक :-५/४/२१

# आदेश

**(मॅक्रो कंटेनमेंट झोन)**

प्रति,
चेअरमन/सेक्रेटरी/बंगला मालक / घर मालक, नाशिक
**प्रियंका ब्लोसोम सिरिन मेडोज , पाइप लाईन रोड , सातपूर , नाशिक**

**विषय** : नाशिक मनपा हद्दीतील आपली रहिवाशी इमारत **प्रतिबंधीत** म्हणुन घोषित केली असल्याने प्रभावी अंमलबजावणी होणेबाबत...

कोविड-१९ प्रतिबंधात्मक कार्यवाही अनुषंगाने नाशिक महानगरपालिका हद्दीमध्ये **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व साथरोग अधिनियम १८९७** नुसार कामकाज सुरु आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसुचना क्रमांक प्र.क्र.५८/आरोग्य ५, दिनांक १४ मार्च २०२० अन्वये निर्गमित महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम, २०२० मधील नियम क्रमांक १० अन्वये महानगरपालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकरी घोषित केलेले आहे. त्यांनी निम्न स्वाक्षरीत यांना प्राधिकृत केलेले आहे.

कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी तपासणी करुन कोविड-१९ बाधित आहे किंवा नाही हे निश्चित केले जाते. त्या अनुषंगाने आपल्या सोसायटीत वास्तव्यात असलेला व्यक्ती कोविड-१९ बाधित असल्याचे स्पष्ट झालेले आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| पत्ता | पेशंट पॉझिटीव झाल्याची तारीख | नकाशा ( होय/ नाही) | सर्वेक्षण करावयाची घरे( संख्या) | कंटेनमेंट झोनची एकुण लोक संख्या | पॉझिटीव पेशंट (संख्या) | प्रतिबंधित जागेचा परिघ (चौ.मी.) | युपीएचसी / विभाग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रियंका ब्लोसोम सिरिन मेडोज , पाइप लाईन रोड , सातपूर , नाशिक | 5/4/21 | होय | 86 | 457 | 10 | 780 | सातपूर |

कोविड-१९ प्रतिबंधात्मक कार्यवाही अनुषंगाने शासन निर्देशानुसार आजाराच्या उद्रेकावर नियंत्रण मिळवण्याची रणनिती तयार करण्यात आलेली असुन, त्यानुसार **आपली इमारत** प्रतिबंधित घोषित करण्यात येत आहे. प्रतिबंधीत क्षेत्राचा नकाशा आपले आरोग्य संविकेने आरेखित केल्याप्रमाणे त्यांचेकडेस उपलब्ध आहे. त्यानुसार,

- **सदर इमारत / परिसर सिल करण्यात येत आहे. इमारतीमधुन आत किंवा बाहेर जाणेचे मार्ग बंद करणेत येत आहे. प्रतिबंधीत क्षेत्र नकाशा संबंधित नोडल वैद्यकिय अधिकारी यांनी तयार करुन पोलिसांना व संबंधित व्यक्ती यांना द्यावा. इमारत सील बंद राहील याची जबाबदारी चेअरमन/ सेक्रेटरी/ बंगला मालक / घर मालक यांची राहील.**
- तातडीचे वैद्यकिय सेवा वगळता कोणत्याही प्रकारची ये-जा होणार नाही व सदर प्रतिबंधित इमारतीमधिल व्यक्ती घर सोडुन बाहेर येऊ शकणार नाही. सर्व सभासद/ राहणारे यांना नियमावली समजावुन सांगणे व सील बंद इमारतीत येण्यास कामवाली बाई/माणुस, भाजीवाला, फळवाला, किराणावाला, धोबी, इतर विक्रेता यांना येण्यास मज्जाव राहील.
- अत्यावश्यक बावी जसे किराणा, भाजी, दुध, औषधे वगैरे करीता ऑनलाईन खरेदी करावी अथवा स्थानिक पुरवठादार यांचेशी समन्वय साधणे. सर्व सामान गेटपर्यंतच मागवावे ते सुरक्षा रक्षकामार्फत ताब्यात घेऊन सर्वांना वितरीत करावे.
- इमारतीत बाधित रूग्ण रहात असल्यास त्यास लागणाऱ्या अत्यावश्यक बाबी तातडीने पुरवाव्यात. त्यांच्या आरोग्य विषयक माहिती फोनव्दारे वेळोवेळी घेण्यात यावी.
- कोणत्याही वैद्यकिय समस्या/ लक्षणे आढळल्यास तात्काळ विभागीय नोडल वैद्यकिय अधिकारी **डॉ.बाजी -९८२२०२२५१८** यांना किंवा - ९६०७६०११३३/९६०७७३५१२८- या हेल्प लाईन क्रमांकावर कळविणे.
- सर्व रहिवाश्यांच्या मोबाईल मध्ये आरोग्य सेतु ॲप्लीकेशन इन्स्टॉल करणेत यावे.
- बाधित रूग्णाच्या सानिध्यातील / संपर्कातील सर्व व्यक्तींचा शोध घेणेसाठी आरोग्य विभागाचे कर्मचारी यांना मदत करावी.
- प्रतिबंधित इमारतीत सर्वेक्षण, वैद्यकिय सुविधा व इतर समन्वयकाची जबाबदारी (पी.एच.एन.)मेरी कोलुर **(मो.क्र.९२७०६४७८०८.)** प्रतिबंधित क्षेत्र नोडल प्रतिनिधी यांची राहिल.
- सदरचे प्रतिबंधक आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करावी.
- सदर प्रतिबंधित क्षेत्रात नव्याने रुग्ण आढळुन न आल्यास सदरचा आदेश पारित दिनांकापासुन २१ दिवसांनी आपसुक व्यपगत होईल.
- प्रतिबंधीत क्षेत्राची संपुर्ण जबाबदारी त्या संबंधीत पोलिस स्टेशन/तेथील नियुक्त पोलिस यांची संपुर्ण जबाबदारी राहिल.
- **सदर आदेशाचे पालन न करणा-या अथवा उल्लंघन करणा-या व्यक्तीं विरुद्ध साथरोग अधिनियम १८९७, भारतीय दंड संहिता १८६०, कलम १८८ नुसार तसेच आपत्ती व्यवस्थापन २००५ अन्वये कारवाई करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**
- **प्रतिबंधित क्षेत्रातुन अतितातडीचे परिस्थितीत एखाद्या व्यक्तीस बाहेर जावयाचे असल्यास संबंधित पोलिस अधिकारी / कर्मचारी यांनी बाहेर जाण्याचे कारणाची शहानिशा करुन परवानगी द्यावी. असे करतांना संबंधितांच्या हातावर प्रतिबंधित क्षेत्रातील व्यक्ती असा शेरा मार्कर पेनाने हातावर लिहावा.**

10/4/21
**(गणेश मिसाळ)**
**उपजिल्हाधिकारी, भुसंपादन क्र.२**
**तथा कंटेनमेंट झोन प्राधिकृत अधिकारी, नाशिक**

**प्रत** :-

- विभागीय अधिकारी, / नोडल अधिकारी, **सातपुर** विभागीय कार्यालय, मनपा, नाशिक
- संबधित पोलिस निरिक्षक / उपायुक्त मुख्यालय ,पोलीस आयुक्तालय

**संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे**

| विभाग | विभागीय अधिकारी | मोबाईल | विभागीय नोडल डॉक्टर | मोबाईल |
|---|---|---|---|---|
| नाशिक पुर्व | श्री. स्वप्नील मुढलवाडकर | 9607503344 | डॉ. पावसकर | 9422275224 |
| ना.पश्चिम | सौ. जयश्री सोनवणे | 9423179123 / 9096666604 | डॉ.जगताप | 9850808565 |
| पंचवटी | श्री.विवेक धांडे | 9607102299 /8806989869 | डॉ. देवकर | 9922020306 |
| नाशिक रोड | श्री. दिलीप मेनकर | 9922903324 | डॉ. धनेश्वर | 9890058654 |
| सातपुर | श्री. नेर नितीन | 9423131321 | डॉ. बाजी | 9822022518 |
| नविन नाशिक | श्री. मयुर पाटील | 8087627141 | डॉ साळुंखे | 9657679370 |

Scanned with CamScanner